सातारा नगरपरिषद सातारा
जाक्र/सानप/निवडणूक/६५/२०२५
दि.१३/१०/२०२५

## सातारा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५
## प्रारुप मतदार यादीबाबतचा सुधारीत कार्यक्रम

**वाचा** - १.राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र क्र.रानिआ/नप-२०२५/प्र.क्र. ०९/का-६ दि. ३०/०९/२०२५ चा आदेश.
२.राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र क्र.रानिआ/नप-२०२५/प्र.क्र. ०९/का-६ दि. १३/१०/२०२५ चा मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम आदेश.

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ११ मा. राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांचेकडील आदेश व राज्य निवडणूक आयोगांनी प्राधिकृत केलेल्या अधिकारी यांनी अंतिम प्रभाग रचना मान्यता दिले नुसार अंतिम प्रभाग रचना अधिसूचना दि. २९/०९/२०२५ रोजी राजपत्रात प्रसिध्द केली आहे.त्यानुसार व वरील आदेशात जाहीर केलेल्या, मतदार यादी विभाजनाच्या कार्यक्रमानुसार २५७ (कोरेगाव) व २६२ (सातारा) या विधानसभा मतदार संघाची दि.१/०७/२०२५ या अधिसूचित दिनांकास अस्तित्वात असलेली **महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी वापरण्याबाबत आदेश दिले आहे अस्तित्वात असलेली मतदार यादी सातारा नगरपरिषदेच्या एकूण १ ते २५ प्रभागांमध्ये विभागून प्रारूप प्रभाग यादी दिनांक ८/१०/२०२५ रोजी अधिनियमाच्या कलम ११ नुसार प्रसिद्ध करण्यात आली आहे.आता उक्त वाचा २ नुसार सुधारीत कार्यक्रम प्राप्त झाला आहे तो खालील प्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| १ | **प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी** | **१७/१०/२०२५** |
| २ | **अंतिम प्रभाग निहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे** | **३१/१०/२०२५** |
| ३ | **मतदान केंद्राची यादी प्रसिध्द करणे आणि मतदान केंद्र निहाय मतदार याद्या प्रसिध्द करणे** | **०७/११/२०२५** |

**सदर प्रारूप प्रभाग मतदार यादी नगरपरिषदेच्या श्री.छ.शिवाजी महाराज सभागृहात नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवल्या आहेत तसेच नगरपरिषदेच्या संकेतस्थळावर (https://sataranp.in)पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. तरी नागरिकांनी आपल्या प्रभागातील मतदार यादीत नाव आहे किंवा नाही हे पाहुन जर आपल्या हरकती/ सूचना असतील तर त्यांनी दिनांक १७/१०/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सातारा नगरपरिषदेच्या कार्यालयात निवडणूक शाखेत दाखल कराव्यात. सदर दिनांकानंतर आलेल्या हरकती/सूचना स्वीकारल्या जाणार नाहीत.** याची कृपया नोंद घ्यावी.

सातारा नगरपरिषद निवडणूक सातारा

(अभिजीत बापट)
मुख्याधिकारी
सातारा नगरपरिषद,सातारा.

**टिप :** हरकती/सूचना देत असताना ज्या मतदाराबाबत हरकती/सूचना दाखल करीत आहे, त्याबाबतचे पुरावे हरकतदाराने सोबत जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर हरकतीची दखल घेतली जाणार नाही, तसेच आयोगाने विहित केलेला अर्जाचा नमुना (नमुना - अ,मतदारासांठी व नमुना-ब,तक्रारदारासाठी) नगरपालिकेच्या नोटीस बोर्डवर नमुना प्रसिध्द केला आहे. तसेचा त्या नमुन्यात हरकत देणे बंधनकारक आहे.